

# संतभूमी संरक्षक संघर्ष समिती-महाराष्ट्र राज्य.



संस्थापक-अध्यक्ष-श्री हरिभक्त मधुसूदन महाराज, भामचंद्र डोंगर, पो.वासुली, ता.खेड (राजगुरुनगर), जि.पुणे संपर्क – ७०८३७०५१७८/९४२०२२४३४१

।। श्री विठ्ठल ।।

श्रीक्षेत्र भामचंद्र डोंगर
दि. / /२०१

प्रति,
सन्माननिय व आदरणिय,
ह.भ.प.श्री ------------------------------
------------------------------------------ यांस रामकृष्ण हरि शिरसाष्टांग दंडवत !

महोदय,

तीर्थक्षेत्र देहू-आळंदी, भंडारा-भामचंद्र-घोऱ्हाडेश्वर पंचक्रोशी परिसर ही महाराष्ट्रातील पवित्र अध्यात्मिक भूमी आहे आणि ती तुम्हां-आम्हां सर्व वारकरी व भाविकांचे स्फूर्तिस्थान आहे, **मात्र सन २००७ मध्ये श्री क्षेत्र भामचंद्र डोंगराला खाणी लावून या संत भूमीची प्रतारणा करुन 'डाऊ' सारख्या घातक रसायन ओकणाऱ्या कंपन्या येथे आणण्याचा प्रयत्न सरकारकडून झाला.** त्या विरोधात माझ्यासारख्याने आवाज उठविताच देहू-आळंदी संस्थानसह आपण सर्व वारकरी सांप्रदायिक भक्त व संस्थांनी एकत्र येऊन एकदिलाने यशस्वी लढा दिला आणि या विषारी कंपनीचा परवाना रद्द करुन तीला महाराष्ट्राच्या महन्मंगल संतभूमीतून हद्दपार करण्यास सरकारला भाग पाडले.

'डाऊ' गेल्यामुळे आपणां सर्वांना असे वाटले की, 'देहू-आळंदी' परिसराचे पावित्र्य व 'भामचंद्र-भंडारा डोंगरा' चे अखंडत्व व साधकांचा येथील एकांत कायम राखण्यात आपण यशस्वी झालो, **परंतु 'डाऊ' घालविण्याचा राग मनात धरुन की काय.. सरकारने येथील व्यावसायिक व खाण उद्योजकांशी हातमिळवणी करुन त्यांच्याकडूनच एम.आय.डी.सी.च्या नावाखाली संत तुकोबांची तपोभूमी भंडारा-भामचंद्र डोंगर ही संतपीठे हळुहळु उध्वस्त करण्याचा पुन्हा प्रयत्न चालवला आहे. शासनाची ही करणी विरोधाभासाची आहे.**

या विरोधात आपण सर्वांनी पुन्हा एकत्र येऊन एकदिलाने आवाज उठविला नाही तर नजिकच्या काळात शासनाद्वारे बिल्डर लॉबीच्या माध्यमातून संपूर्ण भामचंद्र आणि भंडारा डोंगर ही ध्यानकेंद्रे भुईसपाट झाल्याशिवाय राहणार नाहीत. **कारण सरकारने सन २०११ मध्ये हे दोन्ही पूर्ण डोंगर "*जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे राज्य संरक्षित स्मारक*" म्हणून घोषित करण्यावर यानी व एम.आय.डी.सी. ने हरकती घेतल्या आहेत व येथील स्थानिक नेत्यांच्या माध्यमातून सरकार दरबारी संबंधित पुरातत्त्व विभागावर दबाव टाकून येथे विध्वंसक काम चालूच आहे.**

तेव्हां या संदर्भात प्रबोधन करुन व माहिती देवून आंदोलनाचे पुढचे पाऊल टाकण्याची रुपरेषा ठरविण्यासाठी व त्याबाबत आपल्याशी संवाद साधण्यासाठी आम्ही महाराष्ट्रव्यापी दौऱ्याचे आयोजन केलेले आहे. त्या अंतर्गत आपल्या भागात जि. ता. येथे मौजे गावी दि. / /२०१ रोजी वाजता सभा व बैठकीस आम्ही आपल्याकडे येत आहोत. तरी आपण आपल्या गावातील मंदिरात बैठकीचे (सभेचे) स्थान निश्चित करुन परिसरातील सर्व सहकाऱ्यांना तसे कळवावे व सर्वांनी या चिंतन बैठकीस उपस्थित राहून संतभूमि संरक्षणाच्या कार्यास मोलाचा हातभार लावावा. **तुकोबांचे पाईक या नात्याने त्यांच्या ऋणातून उत्तीर्ण होण्यासाठी दैवयोगाने प्राप्त झालेला हा "*रात्रंदिन आम्हां युध्दाचा प्रसंग ।।*" अशा या संघर्षाच्या कर्तव्यपूर्तीने जीवन धन्य करावे...! ही नम्र विनंती.**

आपले विश्वासू,

**संतसेवक प्रवक्ते श्री. गजानन महाराज पिंपळे**
कार्याध्यक्ष मो. ९८५०४२९८०९

*** श्री. ह.भ.प. संचालक** *-संतभूमी संरक्षक संघर्ष समिती-*

**हरिभक्त श्री. मधुसूदन महाराज पाटील**
संस्थापक-अध्यक्ष ७०८३७०५१७८

*पत्रव्यवहाराचा पत्ता*

*विभागीय कार्यालय :-*
**संतभूमी संरक्षक संघर्ष समिती,**
सूर्यभानजी पिंपळे स्मृतीभवन, अलंकापुरीनगर,
आळंदी-देव, ता. खेड, जि. पुणे-४१२ १०५

<u>टिप</u> :- आपण आपल्या तालुक्यातील जास्तीत जास्त भाविकांना व पत्रकारांना प्रत्यक्ष भेटून वा फोन संपर्क करुन किंवा पत्रके काढून (किंवा या पत्राच्या झेरॉक्सद्वारा) या बैठकीची माहिती द्यावी व तसे किर्तनातून ५-१० मिनीटे स्वत: नम्र आवाहन करावे. पत्रासोबत आमच्या महाराष्ट्रव्यापी दौऱ्याचे सूचीपत्र जोडत आहोत. कृपया पत्र मिळताच त्वरीत आमचेशी फोनवर संपर्क साधावा.